ISSN – 2347-7075
Impact Factor– 8.141

# International Journal of Advance and Applied Research

Special Issue On

## "Relevance of Swami Dayanand Saraswati & Indian Nationalism"



January- February 2025

Volume-6 Issue-7

Executive Editors

Dr. Priti D. Pohekar

Dr. T. B. Puri

INTERNATIONAL JOURNAL OF ADVANCE AND APPLIED RESEARCH
ISSN – 2347 -7075 (DOUBLE-BLIND Peer Reviewed) (Bi-Monthly Research Journal)
**Vol. 6 No. 7 *(Part - A)***
**January – February 2025**

**TABLE OF CONTENT**



| Sr. No. | Name of Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | डॉ. अविनाश ज्ञानदेवराव काटे | स्वामी दयानंद सरस्वती और उनकी वैज्ञानिक तर्क पद्धत | 1 - 4 |
| 2 | प्रा. डॉ. आचार्य आर. डी. | स्वामी दयानन्द सरस्वती के सामाजिक विचार एवं कार्य | 5 - 8 |
| 3 | डॉ. सन्मुख नागनाथ मुच्छटे | हिंदी साहित्य के भारतेंदु युग पर स्वामी दयानंद सरस्वती के स्त्री-सुधार संबंधी विचारों का प्रभाव | 9 - 12 |
| 4 | डॉ. दिनकर संतुकराव कळंबे | आर्य समाज : कार्य आणि सुधार दृष्टिकोन | 13 - 15 |
| 5 | प्रा. रमेश शंकरराव सोनवळकर | स्वामी दयानंद सरस्वती यांचा लोकशाही विचार एक चिकित्सक अभ्यास | 16 - 23 |
| 6 | डॉ.गोरखनाथ पांडुरंगराव फसले | स्वामी दयानंद सरस्वती यांचा शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन: त्याची समकालीन प्रासंगिकता | 24 - 30 |
| 7 | डॉ. साहेब राठोड | स्वामी दयानंद सरस्वती यांचे तत्त्वज्ञान | 31 - 33 |
| 8 | डॉ. पी. एस. लांडगे | स्वामी दयानंद सरस्वती यांचे राजकीय विचार | 34 - 36 |
| 9 | प्रा. डॉ. प्रमोद जी. शिंदे | स्वामी दयानंद सरस्वती यांच्या राजकीय विचारांची प्रासंगिकता | 37 - 39 |
| 10 | डॉ. घुगे बालासाहेब बाबुराव | स्वामी दयानंद सरस्वतीजी के सामाजिक विचार | 40 - 43 |
| 11 | प्रा. डॉ. शिवाजी गोविंदराव दिवाण. | स्वामी दयानंद सरस्वती यांची चक्रवर्ती राजाची संकल्पना | 44 - 47 |
| 12 | प्रा. केदा पोपट भदाणे | महर्षी दयानंद सरस्वती यांचे तात्विक विचार | 48 - 52 |
| 13 | डॉ. फारुकी मोहम्मद खय्युम मो. यूनुस | स्वामी दयानंद सरस्वती यांचे सामाजिक आणि राजकीय योगदान | 53 - 56 |
| 14 | डॉ. राम ताटे, डॉ. अर्चना वाघमारे | स्वामी दयानंद सरस्वती यांचे सामाजिक व राजकीय विचार | 57 - 60 |
| 15 | डॉ. तांदळे सुरेंद्र सुंदरराव | स्वामी दयानंद सरस्वती यांचे सामाजिक विचार व कार्य | 61 - 64 |
| 16 | डॉ. रंजना प्रल्हादराव शहाणे | स्वामी दयानंद सरस्वती यांचे राजकीय विचार | 65 - 69 |
| 17 | प्रा. डॉ. विलास कऱ्हाळे | स्वामी दयानंद सरस्वती यांचे राजकीय विचार | 70 - 72 |
| 18 | डॉ.कागदे बी बी | स्वामी दयानंद सरस्वती यांचे आर्थिक विचार | 73 - 75 |
| 19 | डॉ.गोंदकर तुकाराम दत्तात्रय | स्वामी दयानंद सरस्वती यांची राजकीय विचारसरणी | 76 - 80 |
| 20 | डॉ.महादेव रावसाहेब मुंडे | स्वामी दयानंद सरस्वती यांचे राजकीय विचार | 81 - 83 |
| 21 | डॉ.लोखंडे बी.बी. | स्वामी दयानंद सरस्वती यांचे राजकीय विचार | 84 - 88 |
| 22 | प्रा . डॉ. पवार बंडू थावरा | स्वामी दयानंद सरस्वती यांचे लोकशाही विषयी विचार | 89 - 92 |
| 23 | प्रा. डॉ. कदम एच. पी. | स्वामी दयानंद सरस्वती यांची राष्ट्रवादी विचारसरणी | 93 - 96 |
| 24 | प्रा. डॉ. शशिकांत दत्तोपंत परळकर | स्वामी दयानंद सरस्वती यांचे सामाजिक विचार व कार्य | 97 - 101 |
| 25 | प्रा. डॉ. सुभाष ज्ञानोबा पोटभरे | स्वामी दयानंद सरस्वती यांचे राजकीय विचार | 102 - 106 |
| 26 | प्रा. तानाजी रामभाऊ बोराडे | स्वामी दयानंद सरस्वती यांचे तत्वज्ञान | 107 - 113 |
| 27 | प्रा.अशोक रामचंद्र गोरे | महर्षि दयानंद सरस्वती यांचे सामाजिक विचार | 114 - 116 |
| 28 | प्रा.चाटे नारायण संभाजीराव | हैद्राबाद मुक्ती संग्रामातील आर्यसमाजाची भुमिका | 117 - 118 |
| 29 | प्रा.डॉ. शेख गफूर अह्मद | स्वामी दयानंद सरस्वती यांचे धार्मिक विचार | 119 - 124 |

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.7 January - February - 2025

# महर्षि दयानंद सरस्वती यांचे सामाजिक विचार

**प्रा. अशोक रामचंद्र गोरे**
*समाजशास्त्र विभाग,*
*व्यंकटेश महाजन महाविद्यालय, धाराशिव*
*Corresponding Author* – प्रा. अशोक रामचंद्र गोरे
**DOI - 10.5281/zenodo.14784545**

**प्रस्तावना:**

साधुसंत, ऋषी, समाजसुधारंकांची एक अभिमानास्पद परंपरा आपल्या देशात निर्माण झाली आहे. महर्षि दयानंद सरस्वती या परंपरेतील श्रध्देने, सन्मानाने घेतले जाणारे नाव आहे. भक्तिमार्गाने मानवा-मानवातील भेदभाव नष्ट करण्याचा आणि समाजाला विकृत कर्म-कांडातून मुक्त करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. महर्षि दयानंद सरस्वती हे शुध्द मानवतावादी होते. त्यांनी आपले सामाजिक चिार मांडताना कोणताही विशिष्ट धर्म-पंथ डोळ्यासमोर ठेवला नाही. आपल्या विचारांच्या प्रचार, प्रसार आणि अंमलबजावणीसाठी त्यांनी 1875 मध्ये मुंबई येथे 'आर्य समाज' संस्थेची स्थापना केली.

महर्षि दयानंद सरस्वती यांचे मूळ नाम मूलशंकर उर्फ दयाराम, दयालजी असे होते. त्यांना जन्म टकारा, मोरवी, सौराष्ट्र, गुजरात येथे 20 सप्टेंबर 1824 मध्ये झाला. इ.स.1845 मध्ये सत्याच्या-गुरूच्या शोधात त्यांनी गृहत्याग केला इ.स.1848 मध्ये त्यांनी संन्यास घेतला व दयानंद सरस्वती हे नाव धारण केले. इ.स.1883 मध्ये 30 ऑक्टोबरला वयाच्या 59 व्या वर्षी स्वामीजींचे निधन झाले.

महर्षि दयानंद सरस्वती यांच्या ग्रंथ संपदेत ऋग्वेद हिन्दी भाष्य, यजुर्वेद, दयानंद ग्रंथ माला, सत्यार्थ प्रकाश, महर्षि दयानंद के दार्शनिक मन्तव्य, ऋग्वेदादि भाष्य भूमिका या साहित्याचा समावेश होतो.

आधुनिक भारतातील सामाजिक समतेचे श्रेष्ठ पुरस्कर्ते व जाती निर्मुलनाचे प्रबल समर्थन म्हणून महर्षि दयानंद सरस्वती यांचे नाव आदराने घेतले जाते.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे:**

1) महर्षि दयानंद सरस्वती यांचे जीवन अभ्यासने.
2) महर्षि दयानंद सरस्वती यांचे समाज सुधारणेतील योगदान लक्षात घेणे.
3) तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे अवलोकन करणे.
4) महर्षि दयानंद सरस्वती यांचे सामाजिक विचार अभ्यासणे.

**शोधनिबंधाची गृहितके:**

1) महर्षि दयानंद सरस्वती यांचे सामाजिक विचार विश्वव्यापी स्वरूपाचे आहेत.
2) महर्षि दयानंद सरस्वती यांचे विचार विज्ञानवादी आणि आधुनिकतेला चालना देणारे आहेत.

3) वर्तमान परिस्थितीत समाजसुधारणासाठी महर्षि दयानंद सरस्वती यांचे विचार मार्गदर्शक आहेत.
4) सामाजिक न्याय ही संकल्पना साकार करण्यासाठी महर्षि दयानंद सरस्वती यांचे विचार मार्गदर्शक आहेत.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत शोध निबंध तथ्य संकलनाच्या द्वितियक साधन सामग्रीवर आधारीत आहेत. त्यासाठी संदर्भग्रंथ, मासिके, विकिपिडीया या साधनांचा आधार घेण्यात आला आहे.

**विषय विश्लेषण:**

महर्षि दयानंद सरस्वती यांनी आपले संपूर्ण जीवन हे धर्म सुधारणा, समाजसुधारणा आणि सत्याचा शोध घेण्यासाठी समर्पित केल्याचे दिसून येते. आपल्या प्रारंभिक जीवनातील काही अनुभवावरुन आणि त्या अनुभवांवर आधारीत चिंतनावरून मूर्तिपूजेची निरर्थकता त्यांच्या लक्षात आली. मूर्तिपूजेचे कर्मकांड हे धार्मिक सुधारणा मधील मोठा अडथळा असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. ज्ञान प्राप्त करण्याची स्वामिची दृढ इच्छा त्यांच्या जीवनकाळात पदोपदी दिसून येते. त्यांच्या मते, पशु-पक्ष्यांमध्ये असलेले नैसर्गिक ज्ञान सीमित असते; परंतु मनुष्याच्या अंगी असलेल्या क्षमतांच्या, बुध्दीच्या आधारे मानवाने अधिकाधिक ज्ञान प्राप्त केले पाहिजे अन्यथा मनुष्य पशुतुल्य होईल.

सत्य ज्ञानाचा शोध घेणे व असे ज्ञान समाजातील सर्व घटकांपर्यंत नेऊन पोचविणे या तळमळीतून महर्षि दयानंद सरस्वती यांचा जीवन उद्देश निश्चित झाला. त्यातूनच अथक परिश्रमाने 'आर्य चाणक्य' या परिवर्तनवादी संस्थेचा पाया रचला गेला. संस्कृतशास्त्रे आणि योगविद्या यांचे मोठे आकर्षण स्वामींना होते. सत्याचरण व न्यायाचरण यांच्या शिवाय मोक्षप्राप्ती नाही या आपल्या विचारांवर ते ठाम होते. केवळ विचारच नाही तर लोककल्याण व लोकसेवा या कर्म मार्गाचाही त्यांनी अंगिकार केला.

उधमशीलता हा महर्षि दयानंद सरस्वतींचा स्वभाव होता. मनुष्याने दैवावर विश्वास ठेवून उद्यमशीतेपासून विमुख होऊ नये मनुष्य जे कर्म करतो त्यातून पुरूषार्थ व्यक्त झाला पाहिजे. भ्याडपणा, पलायन, निष्क्रियता, अकर्मण्यता यांचा विरोध स्वामींनी नेहमीच केला. भारताला सामर्थ्यशाली, ज्ञानसंपन्न आणि परोपकारी बनविणे यासाठी त्यांनी शेवटपर्यंत प्रयत्न केले. 'परोपकार' या शब्दाला स्वामींनी विशेष महत्त्व दिले आहे. त्यांच्या मते वेद, उपनिषदे, सांख्य, योग इत्यादी दर्शनशास्त्रांमध्ये सांगितलेल्या विचारसरणींचाच अंगिकार केला पाहिजे.

**महर्षि दयांनद सरस्वतींच काही सामाजिक विचार:**

1) मूर्तिपूजा ही अवैदिक, निरर्थक व समाजाला घातक आहे.
2) सामाजिक समता हे आधुनिक काळाचे महत्त्वाचे मूल्य आहे.
3) ब्राह्मणेतरांना यज्ञोपवीत (जानवे) धारण करण्याचा वैदिक अधिकार मिळवून दिला.
4) महर्षिंना जन्माधिष्ठित जाती व्यवस्था मान्य नव्हती.
5) स्वामीजींनी स्त्री-पुरूष समानतेचा पुरस्कार केला.
6) फलज्योतिष व हस्तरेखाशास्त्र या गोष्टींचा त्यांनी विरोध केला.
7) सर्वांच्या उन्नतीमध्ये आपली उन्नती समजावी.
8) सत्याचा स्वीकार व असत्याचा त्याग करण्यास तयार राहिले पाहिजे.
9) धर्म हा पक्षपातरहित, न्यायी व सत्याचा अंगिकार करणारा असावा.

10) प्रारब्धापेक्षा पुरूषार्थ श्रेष्ठ आहे.
11) सदैव धार्मिक बनण्यासाठी सदैव सत्याचेच आचरण करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :**

1) महर्षि दयानंद सरस्वती यांचे विचार सुधारणात्मक आहेत.
2) आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये महर्षि दयानंद सरस्वती यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.
3) आधुनिक भारतात महर्षि दयानंद सरस्वती यांच्या विचारांची प्रासंगिकता अनन्यसाधारण आहे.
4) धर्मसुधारणेमध्ये स्वामीजींचे विचार महत्त्वपूर्ण आहेत.

**संदर्भ :**


1) 'सम्यक विचारगुच्छ व जीवन प्रवास' - संभाजी पवार गुरूजी, प्रकाशक महाजन ब्रदर्स, पुणे.
2) 'समग्र क्रांतीचे अग्रदूत - महर्षि दयानंद सरस्वती' - श्रीपाद जोशी, प्रकाशक हिन्दू स्वाभिमान प्रतिष्ठाण, पुणे.
3) 'महर्षि दयानंद सरस्वती - चरित्र आणि कामगिरी' - हरि सखाराम तुंगार, प्रकाशक यश सुधी तुंगार, पुणे.